# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ७४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.२८ एप्रिल, २०१५ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ७४ वी बैठक मंगळवार, दि.२८ एप्रिल, २०१५ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. घुटे व्ही. बी. | सदस्य |
| ३) | श्री. माळी एस. के., प्रभारी संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ४) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ५) | प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. | सदस्य |
| ६) | प्रा. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ७) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ८) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. देशमुख एम. एस. | सदस्य |
| १०) | डॉ. करचे बी. आर. | सदस्य |
| ११) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १२) | श्री. पाटील बी. पी., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १३) | श्री. माळी एस. के., प्रभारी वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १४) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागत:**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. व सौ. मोहिते-पाटील पी. पी. पत्राद्वारे अनुपस्थिती कळविली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. प्रा. डॉ. पाटील टी. आर., अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी व विभागीय सहसंचालिका (उच्च शिक्षण), सोलापूर विभाग, श्री.गायकवाड बी. आर. हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ ०१ ]
- १२ मार्च, २०१५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे.
- २४ मार्च, २०१५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.

ठराव:
- १२ मार्च, २०१५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.
- २४ मार्च, २०१५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

पान क्र.२५ वर विषय क्र.३(५) मधील विषय, टिपणी व ठराव यामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त केलेला विषय, टिपणी व ठराव खालीलप्रमाणे आहे

| | |
|---|---|
| ३(५) | विद्यापीठाचे आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करण्याकरीता नियुक्त केलेल्या मे. बाहुबली ॲन्ड सन्स, सोलापूर यांना दिलेले काम रद्द करण्याबाबत. |
| | (टिपणी: विद्यापीठाचे आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करण्याकरीता व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने मे. बाहुबली ॲन्ड सन्स, सोलापूर यांची विद्यापीठाचे लेखा परीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. सदर फर्मला दिलेले काम रद्द करण्याची बाब विचारार्थ). |
| ठराव: | विद्यापीठाचे आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करण्याकरीता नियुक्त केलेल्या मे. बाहुबली ॲन्ड सन्स, सोलापूर यांच्यासोबत २०१३-१४, २०१४-१५ व २०१५-१६ या तीन वर्षासाठी केलेला करार रद्द करुन नव्याने लेखा परीक्षकाची नियुक्ती करण्याची प्रक्रिया सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

[ ०२ ] **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २९ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा. कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा. कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

ठराव: **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

[ ०३ ] **व्यवस्थापन परिषद सदस्य व संवैधानिक अधिकारी पदाचा कार्यकाळ संपल्यानंतर त्यांचा सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्याकरिता सन्मानचिन्हाचा नमुना तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा अहवाल विचारार्थ.**

(टिपणी: व्यवस्थापन परिषद सदस्य या पदाचा कार्यकाळ संपल्यानंतर संबंधित सदस्यांचा योग्य ते सन्मान चिन्ह (नावाचा व पदाचा उल्लेख करुन) देवून सन्मान करण्यात यावा असे डॉ. शिळीमकर टी. एन. व्यवस्थापन परिषद सदस्य यांनी दि.१८/११/२०१४ रोजी पत्र दिले होते. सदरचे पत्र व्यवस्थापन परिषदेच्या दि.२९/११/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत विषय क्र.१२ अन्वये, सादर केले असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झालेला होता.

**व्यवस्थापन परिषद सदस्य व संवैधानिक अधिकारी पदावरुन निवृत्त झाल्यानंतर संबंधित सदस्यांचा योग्य तो सन्मान व्हावा या उद्देशाने त्यांचा सन्मान चिन्ह देवून उचित सत्कार करण्यात यावा आणि यासाठीच्या सन्मानचिन्हाचा नमुना तयार करुन घेण्यासाठी डॉ. शिळीमकर टी. एन. व डॉ. सूर्यवंशी एस. एस. यांची समिती गठीत करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

त्यानुसार, विद्यापीठाचे पत्र जा.क्र. सोविसो/सनिवि/८९७६,दि.१०/१२/२०१४ अन्वये, संबंधित समितीला पत्र देवून सन्मानचिन्हाचा नमुना तयार करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते.

सदर समितीने दि.०८/०४/२०१५ रोजी सदरचा अहवाल विद्यापीठास सादर केला असून व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: व्यवस्थापन परिषद सदस्य व संवैधानिक अधिकारी पदाचा कार्यकाळ संपल्यानंतर त्यांचा सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्याकरिता सन्मानचिन्हाचा नमुना तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा अहवाल खालील दुरुस्तीसह स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

१) संबंधित सदस्याच्या नावाखाली त्याच्या कालावधीचा उल्लेख करण्यात यावा.

**[ ०४ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १७ (८) नुसार, विद्यापीठाचा सामाईक शिक्का (Common Seal) तयार करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १७ (८) नुसार, "विद्यापीठाचे अभिलेख, सामाईक शिक्का (Common Seal) आणि व्यवस्थापन परिषद त्याच्याकडे सुपूर्द करील अशा विद्यापीठाची इतर मालमत्ता कुलसचिवाच्या अभिरक्षेत असेल" अशी तरतूद आहे.

सोलापूर विद्यापीठाचा अशा प्रकारचा सामाईक शिक्का (Common Seal) तयार करुन घेण्यात आलेला नाही.

सबब, सोलापूर विद्यापीठाचा सामाईक शिक्का (Common Seal) तयार करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १७ (८) नुसार, विद्यापीठाचे बोधचिन्ह व विद्यापीठाचे मराठी व इंग्रजी भाषेत नाव अशा गोलाकार आकारात विद्यापीठाचा सामाईक शिक्का (Common Seal) तयार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ०५ ] **शै. वर्ष २०१५-१६ मधील ऑक्टो / नोव्हें २०१५ पासून यापूर्वीच्या विद्यापीठीय परीक्षा शुल्कात प्रत्येक दोन सत्रानंतर (प्रति वर्षी) १०% वाढ करण्याची बाब परीक्षा मंडळाच्या शिफारशीन्वये व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: परीक्षा मंडळाच्या दि.१५/०४/२०१५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.१२(२) नुसार खालीलप्रमाणे

(अ) शै. वर्ष २०१५-१६ पासून परीक्षा शुल्कात १०% वाढ करण्यात यावी.

(ब) यापुढे प्रत्येक २ सत्रानंतर (प्रति वर्षी) परीक्षा शुल्कात १०% वाढ करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.

(अ) व (ब) प्रमाणे परीक्षा शुल्कात वाढ करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **ऑक्टो / नोव्हें २०१५ च्या परीक्षेपासून विद्यापीठीय परीक्षा शुल्कात प्रति वर्ष (प्रत्येक दोन सत्रानंतर) १०% वाढ करण्याची परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ०६ ] परीक्षा केंद्रावरील प्राचार्यांना "चिफ कंडक्टर" म्हणून देण्यात यावयाच्या मानधनाची बाब परीक्षा मंडळाच्या शिफारशीन्वये व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

(टिपणी: परीक्षा मंडळाच्या दि.१५/०४/२०१५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.०३ अन्वये प्रति सेशन (१० ते १५ दिवसांसाठी एक सत्र याप्रमाणे) रु.५००/- प्रमाणे मानधन देण्याबाबतची बाब परीक्षा मंडळाच्या शिफारशीन्वये व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: परीक्षा केंद्रावरील प्राचार्यांना "चिफ कंडक्टर" म्हणून प्रति सत्र (१० ते १५ दिवसांसाठी एक सत्र याप्रमाणे) रु.५००/- प्रमाणे मानधन देण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**[ ०७ ] वित्त व लेखा अधिकारी या संवैधानिक पदासाठी निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७९(१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशनास्तव.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठाकडील वित्त व लेखा अधिकारी हे संवैधानिक पद भरण्याकरीता दि.२३/०२/२०१५ रोजी विविध वर्तमानपत्रात व महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर पदासाठी पात्र उमेदवारांनी अर्ज करण्यासाठी अंतिम मुदत दि.२५/०३/२०१५ पर्यंत ठेवण्यात आलेली होती. त्यानुसार एकूण ०७ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत.

सबब, वित्त व लेखा अधिकारी पदाच्या निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७९(१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **वित्त व लेखा अधिकारी या संवैधानिक पदासाठी निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७९(१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून १) डॉ. शेख ए. ए. व २) डॉ. देशमुख एम. एस. यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**

[ ०८ ] **प्रस्तुत विद्यापीठ संलंग्नित महाविद्यालयातील यु. जी. (बी. ए./बी.कॉम./बी.एस्सी.) व पी.जी.(एम.ए./ एम.कॉम./ एम.एस्सी./ एम.सी.ए.) अभ्यासक्रमाच्या शुल्काचे समानीकरण करण्यासंदर्भात शुल्क समितीने यु.जी.(बी. ए. / बी. कॉम. / बी. एस्सी.) व पी. जी. (एम. ए. /एम. कॉम. /एम. एस्सी./एम.सी.ए.) अभ्यासक्रमाच्या केलेल्या शुल्क रचनेच्या दंडकाचा मसूदा व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: विविध महाविद्यालयातील यु. जी. (बी. ए. / बी. कॉम. / बी. एस्सी.) व पी.जी. (एम. ए. / एम. कॉम. / एम. एस्सी. / एम.सी.ए.) अभ्यासक्रमांना प्रत्येक महाविद्यालय समान शुल्क आकारत नसल्याने अनावश्यक शुल्क वाढीचे प्रस्ताव प्रस्तुत विद्यापीठास प्राप्त होत असल्यामुळे तसेच सर्व अभ्यासक्रमाच्या शुल्कामध्ये एकसुत्रता आणण्याच्या दृष्टीने

दि.२० मार्च, २०१५ रोजीच्या शुल्क समितीने यु.जी.(बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.) व पी.जी. (एम.ए./एम.कॉम./एम.एस्सी./एम.सी.ए.) या अभ्यासक्रमांचे केलेले नवीन शुल्क रचनेचे प्रस्तावित दंडक क्र. ३६, दंडक क्र. ३७ व दंडक क्र. ३८ यांचे तक्ते सोबत जोडले असून सदर बाब मान्यतेसाठी शुल्क समितीने व्यवस्थापन परीषदेकडे शिफारस केलेली आहे.

यासंदर्भात शुल्क समितीने नव्याने केलेले व सुधारीत केलेले दंडक क्र. ३६, दंडक क्र.३७ व दंडक क्र.३८ व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव).

ठराव: **प्रस्तुत विद्यापीठ संलंग्नित महाविद्यालयातील यु. जी. (बी. ए. / बी. कॉम./ बी. एस्सी.) व पी. जी. (एम. ए. / एम. कॉम. / एम. एस्सी. / एम. सी. ए.) अभ्यासक्रमाच्या शुल्काचे समानीकरण करण्यासंदर्भात शुल्क समितीने केलेली शिफारस स्विकारुन यु. जी. (बी. ए. / बी. कॉम. / बी. एस्सी.) व पी. जी. (एम. ए. /एम. कॉम. / एम. एस्सी. / एम. सी. ए.) अभ्यासक्रमाच्या केलेल्या शुल्क रचनेच्या दंडकाच्या मसूद्यास व त्यातील बदलास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] दीक्षांत समारंभामध्ये प्रदान करण्यात येणाऱ्या विविध सुवर्णपदकातील कन्नड व उर्दू विषयाचे सुर्णपदक संलग्नित महाविद्यालयातील नियमित विद्यार्थ्यांना प्रदान करणेबाबतची बाब माहितीस्तव सादर.**

(टिपणी: प्रस्तूत विद्यापीठात संपन्न होणाऱ्या दीक्षांत समारंभामध्ये विविध विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना समाजातील मान्यवर व्यक्तीकडून सुवर्णपदक प्रदान करण्यात येतात. दि.२६/०२/२०१५ रोजी संपन्न झालेल्या १० व्या दीक्षांत समारंभात उर्दू व कन्नड विषयाचे सुवर्णपदके देण्याबाबत त्या त्या प्रायोजकांना विचारले असता त्यांनी ही सुवर्णपदके संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात यावीत असे कळविले आहे. त्यामुळे बहिस्थ विद्यार्थ्यांना वगळून नियमित विद्यार्थ्यामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस ही दोन्ही सुवर्णपदके देण्यास मा. कुलगुरुमहोदयांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदरील बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

**ठराव: दीक्षांत समारंभामध्ये प्रदान करण्यात येणाऱ्या विविध सुवर्णपदकातील कन्नड व उर्दू विषयाचे सुर्णपदक संलग्नित महाविद्यालयातील नियमित विद्यार्थ्यांना प्रदान केल्याच्या बाबीची नोंद घेण्यात आली.**

[ १० ] **प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणाऱ्या साहित्यकरिता महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या रक्कमेत प्रति वषी २०% या प्रमाणे रुपये ५ ते १० च्या पटीत (Round off) वाढ करण्याची व अभियांत्रिकी विद्याशाखेकरिता अधिष्ठाता यांनी सुचविल्याप्रमाणे वाढ करण्याची परीक्षा मंडळाची शिफारस व्यवस्थापन परिषदच्या बाब विचारार्थ.**

(टिपणी: दि.१७/११/२०१४ रोजी विज्ञान शाखा अधिष्ठाता व त्या विद्या शाखेतील सर्व अभ्यास मंडळे यांची बैठक आयोजित केलेली होती. सदर बैठकिमध्ये प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणाऱ्या साहित्यकरिता महाविद्यालयांना प्रति विद्यार्थी दिल्या जाणाऱ्या खर्चापोटीच्या रक्कमेमध्ये दुप्पट वाढ वाढ करण्याबाबत शिफारस दिलेली होती. त्यामुळे सदरचा विषय दि.१५ एप्रिल २०१५ रोजीच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात आला असता खालील प्रमाणे ठराव झालेला आहे.

**ठराव: प्रति वषी २०% या प्रमाणे रुपये ५ ते १० च्या पटीत (Round off) वाढ करण्याची व अभियांत्रिकी विद्याशाखेकरिता अधिष्ठाता यांनी सुचविल्याप्रमाणे वाढ करण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.**

सदर ठरावास अनुसरुन अधिष्ठाता अभियांत्रिकी विद्याशाखा यांनी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणाऱ्या साहित्याकरिता महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या रक्कमेत खालील प्रमाणे वाढ सुचविलेली आहे.

| Class | Material Required | Exp. For Material Rs. | Expensed for Tools & Electrical Consumption Rs. | Total Exp. Per Candidate proposed Rs. | Present / Current Rate per Candidate Rs. |
|---|---|---|---|---|---|
| SE (Mech) I- Workshop Pract. II | Dia. ३२ mm Length १५०mm | ५६.०० | २२.०० | ७८.०० | २५.०० |
| TE (Mech)-II Workshop Pract. IV | Dia.३२mm Length १७०mm | ७०.०० | ३४.०० | १०४.०० | ४०.०० |

Faculty of Engineering and Technology

| Sr. No. | Name of Subject | Present/Current Rate per Candidate Rs. | Proposed Revised Rate per Candidate | Remark |
|---|---|---|---|---|
| १ | SE (Mec) Workshop Practice II | २५ | ५० | Against actual Exp Rs.७८/- |
| | TE (Mech)II Workshop Practice IV | ४० | ८० | Against actual Exp Rs.७८/- |

सबब, प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणाऱ्या साहित्यकरिता महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या रक्कमेत प्रति वषी २०% या प्रमाणे रुपये ५ ते १० च्या पटीत (Round off) वाढ करण्याची व अभियांत्रिकी विद्याशाखेकरिता अधिष्ठाता यांनी सुचविल्याप्रमाणे वाढ करण्याची परीक्षा मंडळाची शिफारस व्यवस्थापन परिषदच्या बाब विचारार्थ सादर).

ठराव: **प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणाऱ्या साहित्याकरिता महाविद्यालयांना देण्यात येणाऱ्या रक्कमेत प्रति वर्ष २०% या प्रमाणे रुपये ५ ते १० च्या पटीत (Round off) वाढ करण्याची व अभियांत्रिकी विद्याशाखेकरिता अधिष्ठाता यांनी सुचविल्याप्रमाणे वाढ करण्याची परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ११ ] प्रस्तुत विद्यापीठात रिक्त असलेल्या वर्ग ३ व वर्ग ४ या संवर्गाची पदे सरळसेवेने भरण्याकरिता शैक्षणिक अर्हता निश्चित करण्याची बाब विचारार्थ.**

(**टिपणी :** प्रस्तुत विद्यापीठात रिक्त असलेल्या पदांची भरती करण्याकरिता सन २०१२ मध्ये जाहिरात प्रसिध्द करुन भरतीची कार्यवाही करित असताना महाराष्ट्र शासनाच्या दि.०८/०८/२०१२ रोजीच्या पत्रान्वये भरती प्रक्रिया व निवड प्रक्रियेस पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती दिली होती. सदर भरतीप्रक्रियेवरील बंदी दि.२८/०५/२०१४ च्या पत्रानुसार उठविण्यात आली. त्यानुसार रिक्त असलेली पदे भरण्यासाठी शासनमान्य (Agency) संस्थेमार्फत कार्यवाही करण्यास व्यवस्थापन परिषदेने दि.२४/०६/२०१४ च्या बैठकीत मान्यता दिली.

सद्यपरिस्थितीत सोबत जोडलेल्या यादीतील पदनामाची त्यासमोर दर्शविल्याप्रमाणे पदे रिक्त असून ती भरण्याची प्रक्रिया करावयाची आहे. यापूर्वी दिलेल्या जाहिरातीत त्या त्या पदासमोर दर्शविलेली शैक्षणिक अर्हता प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (टी) नुसार विद्यापीठाचे अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या नियुक्तीची कार्यपध्दती, अर्हता, सेवाप्रवेशाची पध्दती, वेतनमान, वर्तुणूक, शिस्त व त्यांची कर्तव्ये यासह त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती परिनियमाद्वारे तयार करण्याचे अधिकार व्यवस्थापन परिषदेस आहेत. सद्यपरिस्थितीत याबाबतीत परिनियम तयार करण्यात आलेले नाहीत. परिनियम तयार करण्यासाठी व त्यास व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनुसार अधिसभेची मान्यता घेवून मा.कुलपतीकडे पाठवून त्यास मान्यता मिळण्यासाठी बराच कालावधी (दीड ते दोन वर्ष) लागतो. वास्तविक पाहता अशा प्रकारच्या सेवा शर्तीची तरतूद असलेली प्रमाणसंहिता तयार करण्याची तरतूद महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम ८ (३) मध्यें करण्यात आलेली आहे. मात्र २० वर्षे झाली तरी अद्यापपर्यंत शासनाकडून प्रमाणसंहिता तयार करण्यात आलेले नाही. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनुसार शैक्षणिक अर्हता तथा अनुभव तयार करणे आवश्यक आहे.

शासनाकडून प्राप्त झालेल्या दि. २८ मे २०१४ च्या पत्रात "विद्यापीठातील रिक्त पदे नव्याने जाहिरात देवून विहीत नियम व योग्य निवड प्रक्रियेचा अवलंब करुन पुढील भरती प्रक्रिया तात्काळ करण्यासंदर्भात व सदरच्या भरतीप्रक्रियेमध्ये यापूर्वी देण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात यावा." असा उल्लेख करण्यात आला असल्याने सोबत जोडलेल्या शैक्षणिक अर्हता यापूर्वीच प्रसिध्द झालेल्या जाहिरातीत नमूद असल्याने आता त्यात बदल करता येणार नाही.

सबब, सोबत जोडलेल्या विद्यापीठातील रिक्त असलेल्या वर्ग ३ व ४ या संवर्गाची पदे सरळसेवेने भरण्याकरिता शैक्षणिक अर्हता निश्चित करण्याची बाब विचारार्थ.)

**ठराव: प्रस्तुत विद्यापीठात रिक्त असलेल्या वर्ग ३ व वर्ग ४ या संवर्गाची पदे सरळसेवेने भरण्याकरिता खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता निश्चित करुन त्यानुसार जाहिरात प्रसिध्द करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तथापि, या बदलेल्या शैक्षणिक पात्रतेमुळे या जागांकरिता यापूर्वी अर्ज केलेल्या उमेदवारांच्या प्राप्त झालेल्या अर्जाबाबत पात्रतेवरुन काही अडचण निर्माण झाल्यास त्याबाबत कायदेशीर सल्ला घेवून पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ. क्र. | पद | रिक्त पदसंख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | सांख्यिकी सहाय्यक | ०१ | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम.एस्सी. (गणित / सांख्यिकी) / एम.कॉम (गणित / सांख्यिकी) पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२. शासकीय/निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामाचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३. इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. आणि मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>४. संगणक ज्ञानासाठी DOEACC संस्थेच्या C.C.C. किंवा O स्थर किंवा A स्थर किंवा B स्थर किंवा C स्थर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची MS-CIT संगणक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| २ | भांडारपाल | ०२ | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान/ वाणिज्य शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२. शासकीय/निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामाचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>३. संगणक ज्ञानासाठी DOEACC संस्थेच्या C.C.C. किंवा O स्थर किंवा A स्थर किंवा B स्थर किंवा C स्थर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची MS-CIT संगणक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| ३ | लघु-टंकलेखक | ०१ | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२. लघुलेखन मराठी / इंग्रजी ८० श.प्र.मि. तसेच टंकलेखक मराठी ३० श.प्र.मि. व इंग्रजी ४० श.प्र.मि. शासकीय व्यावसायिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य.<br>४. संगणक ज्ञानासाठी DOEACC संस्थेच्या C.C.C. किंवा O स्थर किंवा A स्थर किंवा B स्थर किंवा C स्थर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची MS-CIT संगणक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| ४ | प्रयोगशाळा सहायक | ०२ | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२.विद्यापीठ अथवा महाविद्यालयातील प्रयोगशाळेत काम केलेल्या उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल.<br>३. संगणक ज्ञानासाठी DOEACC संस्थेच्या C.C.C. किंवा O स्थर किंवा A स्थर किंवा B स्थर किंवा C स्थर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची MS-CIT संगणक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |

| अ. क्र. | पद | रिक्त पदसंख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| ५ | कनिष्ठ लिपिक | २२ | १. पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२. इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>४. संगणक ज्ञानासाठी DOEACC संस्थेच्या C.C.C. किंवा O स्थर किंवा A स्थर किंवा B स्थर किंवा C स्थर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची MS-CIT संगणक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| ६ | रेकॉर्ड किपर - नि- लिपिक | ०१ | १. पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२. इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य.<br>४. संगणक ज्ञानासाठी DOEACC संस्थेच्या C.C.C. किंवा O स्थर किंवा A स्थर किंवा B स्थर किंवा C स्थर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची MS-CIT संगणक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>५. रेकॉर्ड किपींगचा कोर्स उत्तीर्ण असणाऱ्यास प्राधान्य. |
| ७ | प्रयोगशाळा परिचर | ०१ | १. बारावी पास.<br>२. शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| ८ | ग्रंथालय परिचर | ०१ | १. बारावी पास.<br>२. सर्टिफिकेट कोर्स इन लायब्ररी ॲन्ड इन्फर्मेशन सायन्स उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| ९ | वाहन चालक | ०२ | १. दहावी पास.<br>२. जड व हलके वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक.<br>३. अनुभव असणाऱ्यास प्राधान्य. |
| १० | शिपाई | ०७ | १. दहावी पास.<br>२. औद्योगिक प्रशिक्षण असणाऱ्यास प्राधान्य. |

[ १२ ] **प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर व कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी या दोन महाविद्यालयातील पीएच. डी. व एम. फील अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याचे पात्रता अर्ज विहित मुदतीनंतर विद्यापीठास सादर केले असल्यामुळे आकारण्यात येत असलेली दंडाची रक्कम माफ करणेसंदर्भात संबंधीत महाविद्यालयांनी केलेली विनंती विचारार्थ.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित विषयात नमुद केलेल्या दोन्ही महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये **पीएच. डी. व एम. फील.** अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज विद्यापीठाने ठरवून दिलेल्या मुदतीतमध्ये दाखल करण्याचे राहून गेले असून आता सदर विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज स्विकारण्यात यावेत आणि यापुढे अशा प्रकारची चुक होणार नसून दंडाची रक्कम माफ करावी अशी विनंती केली आहे. सोबत दोन्ही महाविद्यालयातील प्रवेशीत विद्यार्थ्यांची यादी व पात्रता व दंडाची रक्कम दर्शविणारा तक्ता अ व तक्ता ब जोडला आहे.

कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर येथे पीएच.डी व एम.फील या दोन अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या एकूण विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज विहित मुदतीत विद्यापीठास सादर केले नसल्यामुळे २१ विद्यार्थ्यांची पात्रता शुल्काची व दंडाची अशी मिळून खालील तक्त्यातील रकाना क्र.५ मध्ये नमुद केलेली रक्कम स्विकारावी लागणार आहे.

**अ) कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर.**

| अ.क्र. | विद्यार्थी संख्या | अति विलंब पात्रता शुल्काची एकूण रक्कम | प्रति दिन रु.५०/- प्रमाणे एकूण दंडाची रक्कम | एकूण (३+४) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | २१ | १७,४००/- | १,६५,५५०/- | १,८२,९५०/- |

त्याचप्रमाणे कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी, येथे पीएच.डी अभ्यासक्रमास ७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून संबंधित विद्यार्थ्यांनी त्यांचे पात्रता अर्ज महाविद्यालयाकडे वेळेत दाखल केले आहेत. परंतु संबंधित महाविद्यालयांनी पात्रता अर्ज हे विद्यापीठाकडे विहित मुदतीत सादर केले नसल्यामुळे पात्रता शुल्काची व दंडाची रक्कम अशी मिळून खालील तक्त्यातीलि रकाना क्र.५ मध्ये नमुद केलेली रक्कम स्विकारावी लागणार आहे.

**ब) कॉलेज ऑफ इज्युकेशन बार्शी, ता-बार्शी, जिल्हा- सोलापूर.**

| अ.क्र. | विद्यार्थी संख्या | अति विलंब पात्रता शुल्काची एकूण रक्कम | प्रति दिन रु.५०/- प्रमाणे एकूण दंडाची रक्कम | एकूण (३+४) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ०७ | ५५५०/- | १,१५,३५०/- | रु-१,२०,९००/- |

वरील दोन्ही महाविद्यालयांनी रकाना क्रमांक ३ मध्ये नमुद केलेली अति विलंब पात्रता शुल्काची एकूण रक्कम विद्यापीठ कार्यालयात रोखीने भरलेली आहे. परंतु रकाना क्रमांक ४ मध्ये नमुद केलेली प्रति दिन प्रति विद्यार्थी रु.५०/-प्रमाणे एकूण होत असलेली दंडाची रक्कम भरलेली नसून ती माफ होण्याबाबत विनंती केली आहे.

सबब, उक्त वस्तुस्थिती विचारात घेता कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर याची दंडाची रक्कम रु.१,६५,५५०/- आणि कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी यांची दंडाची रक्कम रु.१,१५,३५०/- इतकी माफ करणेबाबत संबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठास केलेली विनंती विचारार्थ).

ठराव: **प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित कस्तुरबाई शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर व कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी या दोन महाविद्यालयातील पीएच. डी. व एम. फील अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याचे पात्रता अर्ज विहित मुदतीनंतर विद्यापीठास सादर न केल्यामुळे आकारण्यात येणाऱ्या एकूण दंडाच्या ५०% रक्कम माफ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १३ ] शै.वर्ष २०१४-१५ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना शिफारशी करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: शै.वर्ष २०१४-१५ साठी संलग्नित महाविद्यालयांकडून सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे ए. आय. सी. टी. ई अंतर्गत अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव प्राप्त झाले आहे.

प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (४) अन्वये प्रथम महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या शिफारशीकरीता सादर करुन महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या शिफारशीसह व्यवस्थापन परिषदेसमोर शिफारशीस्तव सादर करणे आवश्यक आहे व तद्‌नंतर व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनंतर प्राप्त प्रस्तावांवर विद्यापीठ स्तरावरुन विहीत प्रक्रिया होवून प्रस्ताव संबंधित शिखर संस्था व महाराष्ट्र शासनाकडे पुढील कार्यवाहीस्तव सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन दि.०७/०१/२०१४ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ बैठकीसमोर संलग्नित महाविद्यालयांकडून शै.वर्ष २०१४-१५ करीता नैसर्गिक विस्तारांसाठी प्राप्त प्रस्तावांना शिफारस करण्याची बाब सादर केली असता ठराव क्र.२ अन्वये महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीने सोबतच्या तक्ता 'ब' मधील महाविद्यालयाच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांची शिफारस व्यवस्थापन परिषदेस केलेली आहे.

सबब शै.वर्ष २०१४-१५ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना शिफारशी करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **शै.वर्ष २०१४-१५ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना शासनाकडे शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १४ ] शै.वर्ष २०१५-१६ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना शिफारशी करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: शै.वर्ष २०१५-१६ साठी संलग्नित महाविद्यालयांकडून सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे ए. आय. सी. टी. ई. अंतर्गत व पारंपारिक अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (४) अन्वये, प्रथम महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीच्या शिफारशी करीता सादर करुन महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या शिफारशीसह व्यवस्थापन परिषदेसमोर शिफारशीस्तव सादर करणे आवश्यक आहे व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनंतर प्राप्त प्रस्तावांवर विद्यापीठ स्तरावरुन विहीत प्रक्रिया होवून प्रस्ताव संबंधित प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाहीस्तव विहीत मुदतीत शिखर संस्था व महाराष्ट्र शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन दि.१५/०४/२०१५ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ बैठकीत संलग्नित महाविद्यालयांकडून शै.वर्ष २०१५-१६ करीता नैसर्गिक विस्तारांसाठी प्राप्त प्रस्तावांना शिफारस करण्याची बाब सादर केली असता ठराव क्र ३ अन्वये महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ समितीने सोबतच्या तक्ता 'ब' मधील महाविद्यालयाच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांची शिफारस व्यवस्थापन परिषदेस केलेली आहे.

सबब शै.वर्ष २०१५-१६ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना शिफारशी करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **शै.वर्ष २०१५-१६ करीता संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या नैसर्गिक विस्तारांच्या प्रस्तावांना शासनाकडे शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ १५ ] **शै.वर्ष २०१५-१६ पासून नोंदणीकृत संस्थेकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन पारंपारिक महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावांवर शासन निर्णय क्र.एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४, दि.३०/१०/२०१०, शासन निर्णय क्र. एनजीसी २०११ / (२४० / ११) मशि ४, दि.२५/१०/२०११ व शासन निर्णय क्र. एनजीसी २०१२ / (२४७/१२) मशि ४, दि.०२/०९/२०१३ नुसार केलेली कार्यवाही माहितीस्तव व म. वि. कायदा १९९४ कलम ८२(४) नुसार सदरचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची बाब मान्यतेस्तव.**

(टिपणी: शै. वर्ष २०१५-१६ पासून विद्यापीठाकडे सोबत जोडलेल्या प्रपत्र अ प्रमाणे नोंदणीकृत संस्थाकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून पारंपारिक नवीन महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

सदर प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४, दि.३०/१०/२०१०, शासन निर्णय क्र.एनजीसी २०११ / (२४० / ११) मशि ४, दि.२५/१०/२०११ व शासन निर्णय क्र.एनजीसी २०१२ / (२४७/१२) मशि ४,दि.०२/०९/२०१३ नुसार कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन शै.वर्ष २०१५-१६ पासून नोंदणीकृत संस्थेकडून व संलग्नित महाविद्यालयांकडून पारंपारिक अभ्यासक्रमातंर्गत येणाऱ्या नवीन महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा सुरु करण्यास्तव प्राप्त झालेल्या प्रस्तावावर मा.कुलगुरुमहोदय यांनी सोबत जोडल्या प्रमाणे केलेली कार्यवाही दि.१५/०४/२०१५ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या बैठकीसमोर विषय क्र.५ अन्वये माहितीस्तव सादर करण्यात आली असता, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने ठराव क्र.५ अन्वये उपरोक्त शासन निर्णयानुसार मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आलेली आहे.

सबब, शै.वर्ष २०१५-१६ पासून नोंदणीकृत संस्थेकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन पारंपारिक महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर शासन निर्णय क्र.एनजीसी २०१० / (१९३/१०) मशि ४, दि.३०/१०/२०१०, शासन निर्णय क्र.एनजीसी २०११ / (२४० / ११) मशि ४, दि.२५/१०/२०११ व शासन निर्णय क्र.एनजीसी २०१२ / (२४७/१२ मशि ४, दि.०२/०९/२०१३ नुसार केलेली कार्यवाही माहितीस्तव व म. वि. कायदा १९९४ कलम ८२ (४) नुसार सदरचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची बाब मान्यतेस्तव सादर).

ठराव: **शै.वर्ष २०१५-१६ पासून नोंदणीकृत संस्थेकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन पारंपारिक महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम, अतिरीक्त तुकडी व विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावांवर दि.३०/१०/२०१०, दि.२५/१०/२०११ व दि.०२/०९/२०१३ नुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली व म. वि. कायदा १९९४ कलम ८२(४) नुसार सदरचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा. कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

[ १६(१) ] **विद्यापीठ परिसरातील मुलांचे व मुलींचे वसतिगृह, सर्व शैक्षणिक संकुल व मुख्य प्रशासकीय इमारत येथे सी. सी. टि. व्ही. कॅमेरे बसविणेबाबत.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरात २०० मुलांचे व १०० मुलींची प्रवेश क्षमता असलेले वसतिगृह असून त्या ठिकाणी पूर्ण क्षमतेने विद्यार्थी / विद्यार्थीनींची राहण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. विविध शैक्षणिक संकुलात साधारणत: ८५० विद्यार्थी प्रवेशीत असून प्रशासकीय इमारतीत साधारणत: २५० अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.

सदर मुलांचे व मुलींचे वसतिगृह येथील विद्यार्थी / विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून आणि शैक्षणिक तथा प्रशासकीय बाबीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शैक्षणिक संकुलात आणि प्रशासकीय इमारतीत सी. सी. टि. व्ही. कॅमेरे बसविणे आवश्यक आहे.

सबब, मुलांचे व मुलींच्या वसतिगृह आणि सर्व शैक्षणिक संकुल येथे सी. सी. टि. व्ही. कॅमेरे बसविण्याची बाब व्यवस्थापन परिषद समितीच्या विचारार्थ).

ठराव: **विद्यापीठ परिसरातील मुलांचे व मुलींचे वसतिगृह, सर्व शैक्षणिक संकुल व मुख्य प्रशासकीय इमारत येथे सी. सी. टी. व्ही. कॅमेरे बसविण्यास व त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १६(२) ] मा. कुलगुरु महोदय यांनी स्वत:साठी आणि त्यांच्या कुटूंबियाकरीता सन २०१४-१५ या कालावधीत वैद्यकीय उपचाराकरीता केलेल्या खर्चाच्या परताव्याबाबत.**

(टिपणी: मा. कुलगुरु महोदयांनी स्वत:करीता आणि त्यांच्या कुटूंबियाकरीता सन २०१४-१५ मध्ये दि.२५ जुलै, २०१४ ते दि.०९ मार्च, २०१५ या कालावधीत सोलापूर येथे वैद्यकीय उपचार घेतलेले असून सदरचा खर्च हा मा. कुलगुरु महोदयांनी स्वत: केलेला आहे. अंदाजपत्रकीय तरतूदीमध्ये पुरेशी रक्कम शिल्लक असतापैकी नजर चुकीने सदरची देयके सादर करुन परतावा घेण्याचे राहून गेले आहे. आता यास सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. त्यामूळे सदर देयकास मा. व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

सबब, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये मा. कुलगुरु महोदय यांच्यासाठी वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपूर्ती करीता रु.५,००,०००/- इतक्या रक्कमेची तरतूद केलेली असल्याने उपरोक्त झालेला खर्च खास बाब म्हणून सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकीय तरतूदीमधून खर्ची टाकण्यास व त्याचा परतावा मा. कुलगुरु महोदयांना करण्याची बाब मा. व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

ठराव: **मा. कुलगुरु महोदय यांना स्वत:साठी आणि त्यांच्या कुटूंबियासाठी होणाऱ्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी मान्यता देण्यात येवून सन २०१४-१५ मध्ये यासाठी केलेल्या खर्चाचा परतावा मा. कुलगुरुमहोदयांना आदा करण्यास व हा खर्च सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली खर्ची टाकण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १६(३) ] सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर संचलित सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, कमलापूर, ता.सांगोला हे महाविद्यालय शै.वर्ष २०१५-१६ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याकामी विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

टिपणी:- मा.सहसचिव, सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर यांच्याकडून संस्थेचे संचलित सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, कमलापूर हे महाविद्यालय शै.वर्ष २०१५-१६ पासून बंद करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

| संस्थेचे नाव | जे महाविद्यालय बंद करावयाचे आहे त्या महाविद्यालयाचे नांव | बंद करावयाचे वर्ष | महाविद्यालयात सुरु असलेले अभ्यासक्रम | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर.ता.सांगोला, जि.सोलापूर. | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, कमलापूर.ता.सांगोला, जि.सोलापूर | शै.वर्ष २०१५-१६ पासून | एम.बी.ए. व एम.सी.ए. | कायम विना अनुदानित |

उक्त संस्थेच्या संचलित सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, कमलापूर या महाविद्यालयास शै.वर्ष २००८-०९ पासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर प्रथमत: एम.बी.ए. व तद्नंतर एम.सी.ए. अभ्यासक्रमासह ए.आय.सी.टी.ई. नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची स्वतंत्ररित्या मान्यता मिळालेली होती. उपरोक्त मान्यतेच्या अनुषंगाने व स्थानिक चौकशी समितीच्या अटीपूर्ततेच्या अधिन राहून सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, कमलापूर या महाविद्यालयास शै.वर्ष २००८-०९ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली होती.

सदर महाविद्यालयाच्या (एम.बी.ए. व एम.सी.ए. दोन्ही अभ्यासक्रमाच्या) संलग्निकरणाच्या नुतनीकरणास शै.वर्ष २०१४-१५ पर्यंत मान्यता आहे. परंतु मागील सलग दोन शैक्षणिक वर्षामध्ये मंजूर प्रवेशक्षमता पूर्ण न झाल्याने संस्थेने एम.बी.ए. व एम.सी.ए. अभ्यासक्रमासह सदरचे महाविद्यालय शै.वर्ष २०१५-१६ पासून बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे प्राप्त प्रस्तावात नमुद केले आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२ (महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था बंद करणे) मधील तरतूदींची छायांकित प्रत व तद्अनुषंगिक परिनियम ३७४ ते ३८० ची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.

उक्त संस्थेचे मा.सहसचिव यांनी सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, कमलापूर हे महाविद्यालय शै.वर्ष २०१५-१६ पासून बंद करण्याबाबत एम.बी.ए. व एम.सी.ए. अभ्यासक्रमाचे/महाविद्यालयाचे स्वतंत्र प्रस्ताव सादर केलेले आहेत. परंतु सदर महाविद्यालयाचे प्रथम संलग्निकरणाचे पत्र पाहता एम.बी.ए. व एम.सी.ए. अभ्यासक्रमासह सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, कमलापूर हे एकच महाविद्यालय आहे अशी या कार्यालयाची धारणा आहे. त्यास्तव प्राप्त दोन्ही प्रस्तावाच्या अनुषंगाने स्वतंत्र दोन स्थानिक चौकशी समित्या नियुक्त करण्याऐवजी एकच महाविद्यालय असल्याने एकच स्थानिक चौकशी समिती पाठविण्यात आलेली आहे.

महाविद्यालय / विद्याशाखा / अभ्यासक्रम / विषय / अतिरिक्त तुकडी / अतिरिक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता बंद करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर संबंधित महाविद्यालयाला भेट देऊन आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ९२(३) अन्वये खालीलप्रमाणे त्रि-सदस्यीय स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आलेली होती.

१. डॉ. ए.ए. शेख (अध्यक्ष)
२. डॉ. आर.एस. हेगडी (सदस्य)
३. डॉ. पी.व्ही. डोळस (सदस्य)

सदर समितीने उपरोक्त महाविद्यालयास भेट देवून सविस्तर अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला आहे. सदर अहवालात समितीने सदर महाविद्यालय (एम.बी.ए. व एम.सी.ए. अभ्यासक्रमासह) शै.वर्ष २०१५-१६ पासून टप्प्याटप्याने बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

ए.आय.सी.टी.ई. नवी दिल्ली यांचे नियमावलीनुसार त्यांचे प्राधिकरणातंर्गत येणारे महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरिक्त विद्यार्थी प्रवेशक्षमता / विद्याशाखा / अतिरिक्त तुकडी बंद करण्यासाठी संबंधित विद्यापीठाचे ना-हरकत प्रमाणपत्र ए.आय.सी.टी.ई. कडे सादर करणे महाविद्यालयास अनिवार्य आहे.

सदर ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी विद्यापरिषदेची व तद्नंतर व्यवस्थापन परिषदेची मान्यता घ्यावी लागणार आहे. त्यास्तव सदर बाब दि.२३/०४/२०१५ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत सादर केले असता विद्यापरिषदेने ठराव क्र.११३ (४०) अन्वये सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर या संस्थेचे संचलित सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, कमलापूर. ता.सांगोला हे महाविद्यालय शै.वर्ष २०१५-१६ पासून टप्प्याटप्याने बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, कमलापूर, ता.सांगोला हे महाविद्यालय शै.वर्ष २०१५-१६ पासून टप्प्याटप्याने बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याकामी विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव: **सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर संचलित सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, कमलापूर, ता.सांगोला हे महाविद्यालय शै.वर्ष २०१५-१६ पासून बंद करण्यासंदर्भात ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याकामी विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १६(४) ] डॉ. एस. आर. गेंगजे यांचे दि.०९/०४/२०१५ रोजीचे पत्र विचारार्थ.**

(टिपणी: भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाबद्दल मा.कुलपती यांचे कार्यालय, विद्यार्थी, पालक व विविध संघटनांकडून संलग्नता विभाग, तक्रार निवारण कक्ष, पी.जी.बी.यु.टी.आर.विभाग तसेच शिक्षक मान्यता विभागाकडे वेगवेगळया मुद्दयाला अनुसरुन तक्रारी प्राप्त झालेले होते.

उक्त महाविद्यालयाबद्दल प्राप्त तक्रारी दि.२०/०२/२०१५ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर केले असता ठराव क्र.०५ अन्वये व्यवस्थापन परिषदेने महाविद्यालय तथा महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाबद्दल प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी करुन शिफारशींसह अहवाल सादर करणेकामी ॲड.बी.एस.सलगर, प्राचार्य श्री. एस.के.पवार, डॉ.एम.एस.देशमुख व डॉ.एस.आर.गेंगजे या चार सदस्यिय समिती नियुक्त केलेली होती. त्याअनुषंगाने समितीतील सर्व सदस्यांना नियुक्ती पत्र व भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव, सोलापूर या महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाबद्दल प्राप्त झालेले तक्रारींच्या छायांकित प्रति चौकशी करुन अहवाल सादर करणेकामी पाठविण्यात आलेले आहेत.

दरम्यान उपरोक्त प्रमाणे नियुक्त केलेल्या समितीचे सदस्य डॉ. एस. आर.गेंगजे यांनी सद्यस्थितीत ते त्यांच्या कौटुंबीक कामात व्यस्त असल्यामुळे सदर समितीवर काम करण्यास असमर्थता दर्शविलेली आहे.

सबब, भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव यांच्याबद्दल प्राप्त झालेल्या तक्रारीला अनुसरुन नियुक्त केलेल्या चौकशी समिती सदस्य डॉ. एस. आर. गेंगजे यांच्याकडून प्राप्त झालेले पत्र विचारार्थ).

ठराव: **डॉ. एस. आर. गेंगजे यांनी त्यांच्या दि.०९/०४/२०१५ रोजीच्या पत्रानुसार केलेली विनंती मान्य करण्यात येवून त्यांच्या ऐवजी या समितीमध्ये प्रा. सुयवंशी एस. एस. यांचा समावेश करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| सचिव | अध्यक्ष |
| व्यवस्थापन परिषद | व्यवस्थापन परिषद |